मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवडमध्ये “अजितसृष्टी” उभारण्याच्या प्रस्तावाला मंजुरी!

## महापालिका सर्वसाधारण सभेत सर्वपक्षीय नगरसेवकांची मान्यता, भाजपा आमदार महेश लांडगे यांनी मानले पदाधिकारी-नगरसेवकांचे आभार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराच्या राजकीय व विकासाच्या इतिहासात महत्त्वपूर्ण ठरणारा निर्णय महापालिका सर्वसाधारण सभेत एकमताने घेण्यात आला. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नव्या प्रशासकीय इमारतीच्या आवारात “अजितसृष्टी” उभारण्याच्या प्रस्तावाला सर्वपक्षीय नगरसेवकांनी मंजुरी दिली. याबाबत महापौर रवि लांडगे यांनी घोषणा केली.




दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महाराष्ट्राच्या विकासात योगदान दिले आहे. त्यांच्या स्मरणार्थ पिंपरी-चिंचवडमध्ये “अजितसृष्टी” उभारण्यात यावी, अशी सूचना भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी दिली होती. यावर महापौर आणि सभागृहातील पदाधिकारी-नगरसेवकांनी सर्वानुमते पाठिंबा दिला आणि प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. याबाबत आमदार लांडगे यांनी सभागृह आणि पदाधिकाऱ्यांचे आभार मानले आहेत.

चिंचवड येथील डी-मार्टसमोरील सुमारे 33.86 एकर जागेत महापालिकेची नवीन प्रशासकीय इमारत उभारली जात असून, त्यापैकी 8.65 एकर जागेवर मुख्य इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. भविष्यात संपूर्ण महापालिकेचे प्रशासकीय कामकाज याच भव्य इमारतीतून चालणार आहे. याच परिसरात अजितदादांच्या स्मरणार्थ भव्य स्मारक उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

> “लोकनेते दिवंगत अजित पवार यांनी महाराष्ट्राच्या विकासासाठी दिलेले योगदान बहुमूल्य आहे. त्यांच्या स्मृती जतन करण्यासाठी पिंपरी-चिंचवडमध्ये ‘अजितसृष्टी’ उभारण्याच्या प्रस्तावाला एकमताने मंजुरी दिल्याबद्दल महापौर, पदाधिकारी आणि सर्व नगरसेवकांचे मनःपूर्वक आभार मानतो. हा निर्णय पिंपरी-चिंचवडच्या विकासदृष्टीला आणि एकात्मतेला बळ देणारा ठरेल.”
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

“अजितसृष्टी” मध्ये शहराच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या विकासाचा इतिहास, औद्योगिक प्रगती, नागरी सुविधा विस्तार आणि भविष्यातील विकास आराखड्याची ‘फ्युचर प्रिंट’ साकारण्यात येणार आहे. तसेच अजितदादांचा ब्राँझमधील पूर्णाकृती पुतळा उभारण्यात येणार असून, जुन्या प्रशासकीय भवनातील सभागृहात त्यांचे तैलचित्र बसविण्यात येणार आहे. नव्या इमारतीतील प्रमुख सभागृहाला देखील अजितदादांचे नाव देण्याचा निर्णय सभेत घेण्यात आला.

दरम्यान, महापौर रवि लांडगे यांनी सभेत महत्त्वपूर्ण घोषणा करत प्रशासनाला स्पष्ट निर्देश दिले की, महापालिका प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी तसेच सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी यांच्या उपस्थितीत नवीन प्रशासकीय इमारतीच्या कामाची संयुक्त पाहणी करण्यात यावी. यासोबतच त्या ठिकाणी “अजितसृष्टी” उभारण्याबाबत आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही तातडीने सुरू करण्यात यावी, असेही त्यांनी निर्देशित केले.

---

# निगडी जलशुद्धीकरण केंद्रावरील देखभाल दुरुस्तीसाठी 23 फेब्रुवारी रोजी शहरातील पाणीपुरवठा बंद राहणार

## पिंपरी-चिंचवड शहरातील सर्व भागांचा संध्याकाळचा पाणीपुरवठा पूर्णतः बंद राहणार आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत से.क्र. २३ येथील स्थापत्य व विद्युत विषयक कामे तसेच क्षेत्रीय स्तरावरील पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेतील स्थापत्य व विद्युत विषयक देखभाल दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येणार आहेत.या कामांसाठी सोमवार, दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ रोजी निगडी जलशुद्धीकरण केंद्रावरून होणारा पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे.



पिंपरी-चिंचवड शहरातील पाणीपुरवठा व्यवस्थेत कोणताही खंड पडू नये, यासाठी वेळोवेळी पाणीपुरवठा यंत्रणेची देखभाल व दुरुस्ती करणे आवश्यक असते. त्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत से.क्र. २३ येथील स्थापत्य व विद्युत विषयक कामे तसेच क्षेत्रीय स्तरावरील पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेतील स्थापत्य व विद्युत विषयक देखभाल दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येणार आहेत.

या कामांसाठी सोमवार, दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ रोजी निगडी जलशुद्धीकरण केंद्रावरून होणारा पाणीपुरवठा बंद ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे सोमवार, दिनांक २३/०२/२०२६ रोजी पिंपरी-चिंचवड शहरातील सर्व भागांचा संध्याकाळचा पाणीपुरवठा पूर्णतः बंद राहणार आहे.

> “पाणी पुरवठा बंद कालावधीत नागरिकांनी मनपाकडील उपलब्ध पाण्याचा पुरेसा साठा करून पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. देखभाल दुरुस्तीची कामे वेळेत पूर्ण करून पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी महानगरपालिका प्रशासन प्रयत्नशील असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.पाणीपुरवठ्यातील या तात्पुरत्या अडचणीसाठी नागरिकांनी समजून घेऊन मनपास सहकार्य करावे.
>
> **- विक्रांत बगाडे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड**

तसेच या कामांचा परिणाम म्हणून दुसऱ्या दिवशी मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळचा पाणीपुरवठा अनियमित व कमी दाबाने होण्याची शक्यता आहे. नागरिकांनी या बाबीची नोंद घ्यावी, असे आवाहन महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून करण्यात आले आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये पाणीटंचाई व दूषित पाण्यावरून सभागृहात संताप

## कमी दाबाने पाणीपुरवठा, काही भागांत दूषित पाणी; संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी, भामा आसखेड योजनेला गती देण्याचे आदेश

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेची निवडणूक झाल्यानंतर अनेक भागात पाणीटंचाई निर्माण झाली आहे. कमी दाबाने पाणीपुरवठा होत असून, काही भागांत दूषित पाणी येत आहे. त्यावरून नगरसेवकांनी सभागृहात संताप व्यक्त केला. या प्रकरणाचा शोध घेऊन संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणीही करण्यात आली.

निवडणुका झाल्यानंतर पिंपळे गुरव, सुदर्शनगर परिसरात पाणीटंचाई निर्माण झाली आहे. अपुऱ्या प्रमाणात कमी दाबाने पाणी येत असल्याने नागरिकांनी रोष व्यक्त करीत आहेत. हा प्रकार जाणीवपूर्वक केला जात असल्याचा आरोप भाजपचे शाम जगताप, रविना आंघोळकर यांनी केला. स्मार्ट सिटीतील भागात असे होत असल्याबद्दल आंघोळकर यांनी आश्चर्य व्यक्त केले. चिखली परिसरात, कमी दाबाने आणि दूषित पाणीपुरवठा होत असल्याची तक्रार राष्ट्रवादीचे विकास साने व यश साने यांनी केली. पवना नदीतून कमी प्रमाणात पाणी सोडले जात असल्याने महापालिकेस 15 ते 20 एमएलडी पाणी कमी मिळत आहे. त्याकडे अधिकारी लक्ष देत नसल्याने शहरात कृत्रिम पाणीटंचाई निर्माण झाल्याचा दावा भाजपचे संजय काटे यांनी केला.

दापोडी, फुगेवाडी, कासारवाडी या भागांकडे महापालिका प्रशासनाचे पूर्वीपासूनच दुर्लक्ष होत आहे. जाणीवपूर्वक पाणी कमी प्रमाणात सोडले जाते, असा आरोप राष्ट्रवादीचे राजू बनसोडे यांनी केला. तत्कालिन आयुक्त शेखर सिंह यांनी प्रशासकीय राजवटीत भ्रष्ट कारभार केला असून, त्यांची पाप नाशिकमध्येही धुतली जाणार नाहीत, अशी टीका त्यांनी केली. आकुर्डी भागात पाणी टंचाईने नागरिक त्रस्त असल्याचे भाजपचे कैलास कुटे यांनी सांगितले. विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी गेल्या तीस वर्षांपासून शहरातील पाणी समस्या जैसे थे असल्याचा आरोप केला. पाणी गळती कमी करण्यास प्रशासनाला यश आले नसून, सल्लागारांवर मात्र, कोट्यवधीचा खर्च केला जात असल्याची टीका त्यांनीकेली. संपूर्ण शहराचा पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी पाणीपुरवठा विभागाने तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी केली.

चार वर्षातील प्रशासकीय राजवटीत अधिकाऱ्यांचा माज वाढला आहे. ते नगरसेवकांना सकारात्मक प्रतिसाद देत नाहीत. काही कामे घेऊन गेल्यास निधी नसल्याचे सांगत जबाबदारी झटकत आहेत. त्यामुळे निवडून आलेल्या नगरसेवकांचा उत्साह कमी होत आहे. आपण या काळात का निवडून आलो, असा प्रश्न त्यांना पडत आहे. अधिकाऱ्यांनी प्रशासकीय राजवटीतील मस्तीत राहू नये. त्यांनी नगरसेवकांना सकारात्मक प्रतिसाद द्यावा. प्रभागातील एखादे काम सांगितल्यानंतर त्याला नकार न देता त्याला पर्याय उपलब्ध करून द्यावा. मुजोर अधिकाऱ्यांचा माज उतरवला जाईल, असा इशारा सत्ताधाऱ्यांसह विरोध नगरसेवकांनी दिला आहे.



### अग्निशमन विभागाच्या अधिकाऱ्यांवर संताप

» अग्निशमन विभागाचा एक अधिकारी पैसे घेतल्याशिवाय फायर सर्टीफिकेट देत नाही. त्यांची मुजोरी वाढत चालली आहे. ठराविक रक्कम जमा झाल्याशिवाय तो अधिकारी घरी जात नाही, असा आरोप सभागृहात अनेक नगरसेवकांनी केला. त्यांची दखल घेऊन महापौरांनी त्या भ्रष्ट अधिकाऱ्यांची तडकाफडकी इतर विभागात बदली करण्याचे आदेश आयुक्तांना दिले. अग्निशमन विभागाच्या संबंधित परवाने क्षेत्रीय अधिकाऱ्यांमार्फत देण्याची सूचनाही केली.

### पाणी योजनेसाठी नवीन ठेकेदार नेमा: महापौर रवी लांडगे

» भामा आसखेड पाणी योजनेच्या जलवाहिनीचे काम 70 टक्के पूर्ण झाले आहे. संथ गतीने काम करणाऱ्या ठेकेदाराला बदलून तेथे नवीन ठेकेदार नेमण्याची प्रक्रिया पुढील सभेपर्यंत पूर्ण करा. तो प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर शहराला 167 एमएलडी स्वच्छ पाणी मिळणार आहे. त्यामुळे शहराची पाण्याची गरज भागणार आहे, असे आदेश महापौर रवी लांडगे यांनी आयुक्तांना दिले.

### दर महिन्याच्या 15 तारखेस सर्वसाधारण सभा

» महापालिकेची सर्वसाधारण सभा दर महिन्याच्या 15 तारखेस घेण्यात येणार आहे. त्या दिवशी सुटी आल्यास आदल्या दिवशी सभा घेण्यात येईल, असे महापौर रवी लांडगे यांनी जाहीर केले.

# जुनी सांगवीत 'पवना थडी' जत्रेची तयारी वेगात सुरु

## मंडप, स्टॉल उभारणीचे काम, महिला बचत गटांच्या कार्यकर्त्यांची लगबग सुरु

**पिंपरी | प्रतिनिधी**

सांगवी येथील पीडब्ल्यूडी मैदानावरील नियोजित 'पवना थडी' जत्रेच्या तयारीला सुरुवात करण्यात आली आहे. मंडप, स्टॉल उभारणीचे काम चालू झाले असून महिला बचत गटांच्या कार्यकर्त्यांची लगबग सुरू झाली आहे. यावेळी मागणी अर्जाची संख्या चौपट झाली असून एकूण स्टॉल्सची संख्या ७०० वर जाऊन पोहोचली आहे. बुधवारपासून (ता.२५) जत्रेला सुरुवात होत आहे.

महिला उद्योजकतेला चालना देण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेकडून दरवर्षी 'पवना थडी' जत्रा भरविली जाते.

स्थानिक उत्पादनांना बाजारपेठ मिळावी, महिलांना आर्थिक स्वावलंबन साधता यावे आणि ग्रामीण संस्कृतीचे जतन व्हावे, हा या उपक्रमामागील उद्देश असल्याने 'पवना थडी' जत्रेचे व्यासपीठ महिला वर्गासाठी महत्त्वाचे ठरत आहे.




जत्रेच्या पार्श्वभूमीवर परिसरात मंडप उभारणे, विद्युत सजावट, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृहांची उभारणी तसेच सुरक्षा व्यवस्थेची आखणी केली जात आहे. दरवर्षी महिला बचत गटांच्या सदस्या स्टॉलची मांडणी, सजावट आणि उत्पादनांची पॅकिंग यामध्ये उत्साहाने सहभाग घेतात. अनेक गटांनी पारंपरिक पाककृती, सणासुदीचे पदार्थ, हातमागावरील वस्तू आणि पर्यावरणपूरक साहित्य यांची तयारी सुरू केली आहे. पारंपरिक खाद्यपदार्थ, हस्तकला वस्तू, घरगुती उत्पादने आणि ग्रामीण कलाकुसर यांची विक्री करण्यासाठी स्टॉल उभारणीचे काम वेगाने सुरू आहे. मागील वर्षांप्रमाणे यंदाही मोठ्या संख्येने नागरिक जत्रेला उपस्थित राहतील, असा आयोजकांचा विश्वास आहे.

# वायसीएम रुग्णालयातील सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह

## तातडीने उपाययोजना करण्याची विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत कार्यरत असलेल्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय (वाय.सी.एम.एच.) येथील सुरक्षा व्यवस्थेबाबत गंभीर त्रुटी असल्याचा मुद्दा समोर आला आहे. विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी रुग्णालयाच्या पाहणी दौऱ्यानंतर आयुक्तांकडे लेखी निवेदन सादर करत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

भेटीदरम्यान रुग्णालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर सक्षम सुरक्षा यंत्रणा नसल्याचे निदर्शनास आल्याचे त्यांनी नमूद केले. येणाऱ्या नागरिकांची मेटल डिटेक्टर मशीन किंवा बॅग तपासणी यंत्राद्वारे तपासणी होत नसल्याचे प्रत्यक्ष पाहणीत आढळल्याचे निवेदनात म्हटले आहे.




भाऊसाहेब भोईर यांनी म्हटले आहे की, शहरातील समाजकंटकांकडून रुग्णालय परिसरात अनुचित व हिंसक प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत रुग्ण, डॉक्टर व कर्मचाऱ्यांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो. बॉम्ब किंवा इतर घातक शस्त्रांच्या वापराची शक्यता लक्षात घेता प्रवेशद्वारावर अत्याधुनिक सुरक्षा यंत्रणा उभारणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यासंदर्भात रुग्णालयाच्या प्रवेशद्वारावर मेटल डिटेक्टर मशीन व बॅग स्कॅनिंग मशीन बसवण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने आदेश द्यावेत, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

दरम्यान, या मागणीवर महानगरपालिकेकडून काय भूमिका घेतली जाते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. रुग्णालयात दररोज हजारो नागरिक उपचारासाठी येत असल्याने त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

# विषय समित्यांच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष पदाच्या निवडणुकांना मुहूर्त मिळाला !

## महापालिकेच्या तिजोरीच्या चाव्या हातात असलेल्या स्थायी समितीच्या अध्यक्ष पदासाठी सोमवारी ( 23 फेब्रुवारीला) निवडणूक होणार आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेची निवडणूक होऊन आणि निकाल जाहीर होऊन एक महिना पूर्ण झाला आहे. नवीन महापौर म्हणून भाजपने मंजुषा नागपुरे यांना संधी दिली आहे. उपमहापौर पदी परशुराम वाडेकर विराजमान झाले आहे. सभागृह नेते म्हणून गणेश बीडकर यांच्याकडे जबाबदारी देण्यात आली असून स्थायी समितीच्या अध्यक्ष पदासाठी ज्येष्ठ नगरसेवक श्रीनाथ भिमाले यांनी उमेदवारी अर्ज भरला आहे.

महापालिकेच्या विषय समित्यांच्या सदस्यांची नियुक्ती देखील करण्यात आली आहे. शहर सुधारणा, विधी, शिक्षण, महिला व बालकल्याण, क्रीडा तसेच नाव समिती या विषय समित्यांच्या अध्यक्ष, उपाध्यक्षपदाची निवडणूक कधी होणार याबाबत उत्सुकता होती. मात्र आता या निवडणुका कधी होणार हे निश्चित करण्यात आले आहे. पुढील आठवड्यात या सर्व विषय समित्यांच्या निवडणुका होणार आहे. शुक्रवारी २७ फेब्रुवारीला या निवडणुका होणार आहे. यासाठीचे अर्ज सोमवारी (२३ फेब्रुवारीला) स्वीकारले जाणार आहेत. दुपारी तीन ते सहा या वेळेत नगरसचिव कार्यालयात हे अर्ज स्वीकारले जाणार आहेत.

महापालिकेच्या तिजोरीच्या चाव्या हातात असलेल्या स्थायी समितीच्या अध्यक्ष पदासाठी सोमवारी ( २३ फेब्रुवारीला) निवडणूक होणार आहे. स्थायी समितीसाठी महापालिकेत सत्ताधारी असलेल्या भारतीय जनता पक्षाने माजी सभागृह नेते श्रीनाथ भिमाले यांना संधी दिली असून त्यांनी उमेदवारी अर्ज भरला आहे. स्थायी समितीमध्ये भाजपचे १२ सदस्य असल्याने भिमाले यांचा विजय निश्चित आहे.

स्थायी समिती अध्यक्षपदाच्या निवडणुकीनंतर विविध विषय समित्यांच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांच्या नेमणुका केल्या जाणार आहेत. त्यासाठी ही निवडणूक होणार आहे. त्यानुसार अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवडणूक पुढील आठवड्यात शुक्रवार २७ फेब्रुवारी रोजी होणार आहे, अशी माहिती नगरसचिव योगिता भोसले यांनी दिली.

विषय समित्यांच्या बैठकीत या निवडणुका होतील. यासाठी पीठासीन अधिकारी म्हणून समाजकल्याण आयुक्त दीपा मुधोळ-मुंढे यांची नेमणूक विभागीय आयुक्तांनी केली आहे. या निवडणुकीसाठी नामनिर्देशित पत्र स्विकारण्याचा दिवस सोमवार २३ फेब्रुवारी असणार आहे. दुपारी ३ ते सायंकाळी ६ यावेळेत इच्छुकांना अर्ज दाखल करता येणार आहेत.




### २७ फेब्रुवारीला विषय समित्यांच्या निवडणुका

**» शहर सुधारणा, विधी, शिक्षण, महिला व बालकल्याण, क्रीडा तसेच नाव समितीच्या अध्यक्ष व उपाध्यक्षपदाच्या निवडणुका शुक्रवार, २७ फेब्रुवारी रोजी होणार आहेत. इच्छुकांकडून अर्ज २३ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ ते ६ या वेळेत स्वीकारले जाणार आहेत. या निवडणुकांसाठी पीठासीन अधिकारी म्हणून दीपा मुधोळ-मुंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.**

### या वेळेत होतील निवडणुका

- » विधी समिती : सकाळी ११.३०
- » शहर सुधारणा समिती : दुपारी १२
- » महिला व बाल कल्याण समिती : दुपारी १२.३०
- » क्रीडा समिती : दुपारी १
- » शिक्षण समिती : दुपारी १.३०
- » नाव समिती : दुपारी २

### २३ फेब्रुवारीला स्थायी समिती अध्यक्षपदाची निवड

**» पुणे महापालिकेच्या स्थायी समिती अध्यक्षपदाची निवडणूक सोमवार, २३ फेब्रुवारी रोजी होणार आहे. सत्ताधारी भाजपकडून श्रीनाथ भिमाले यांनी उमेदवारी अर्ज भरला आहे. स्थायी समितीत भाजपचे १२ सदस्य असल्याने त्यांचा विजय निश्चित मानला जात आहे. ही समिती महापालिकेच्या आर्थिक निर्णयांसाठी महत्त्वाची मानली जाते.**

# पुणे बसमध्ये डिजिटल बोर्ड बंद असल्यास कारवाई अटळ

## भाडे तपासणी दरम्यान तपासनिसांनीही डिजिटल बोर्ड सुरु असल्याची पडताळणी करावी

**पुणे | प्रतिनिधी**

प्रवाशांना अचूक व वेळेवर माहिती मिळावे यासाठी पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपी) प्रशासनाने बसमधील एलईडी (डिजिटल) मार्गदर्शक फलक नियमित सुरू ठेवण्याचे सक्त आदेश दिले आहेत. डिजिटल बोर्ड बंद आढळल्यास संबंधित कर्मचारी व अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.

अलीकडील काळात काही बसमध्ये डिजिटल फलक सुरू नसणे, मार्गाची माहिती अद्ययावत न करणे, तसेच पुढील व मागील मार्गफलक न लावणे याबाबत प्रवाशांकडून वारंवार तक्रारी येत होत्या. त्यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले. या पार्श्वभूमीवर मुख्य वाहतूक व्यवस्थापक (ऑपरेशन) यांनी चालक, वाहक, गॅरेज पर्यवेक्षक, टाइमकीपर व आगार व्यवस्थापकांना लेखी सूचना जारी केल्या आहेत.

खासगी कंत्राटदारांच्या बसमध्येही डिजिटल प्रणाली कार्यान्वित नसल्यास संबंधित ठेकेदारांवर जबाबदारी निश्चित करण्यात येणार आहे. तसेच, सकाळी आठ वाजल्यापासून डेपोमधून सुटणाऱ्या प्रत्येक बसची नोंद ठेवून तपासणी करण्याचे आदेश प्रशासनाने दिले आहेत. डिजिटल फलक बंद राहिल्यास महामंडळाची प्रतिमा मलिन होत असल्याची खंत व्यक्त करत, या प्रकरणात कोणतीही हलगर्जीपणा सहन केला जाणार नसल्याचे पीएमपी प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

परिपत्रकानुसार, बस डेपोमधून मार्गस्थ होण्यापूर्वी एटीएमएस तपासणीदरम्यान एलईडी प्रणाली कार्यरत आहे का, याची खात्री करणे बंधनकारक करण्यात आले आहे. चालकांनी डिजिटल बोर्डवर योग्य बसमार्ग, प्रारंभ व अंतिम गंतव्यस्थानाची माहिती अचूकरीत्या अपडेट करणे आवश्यक आहे. याशिवाय, बस सुटताना पुढील व मागील मार्गदर्शक फलक व्यवस्थित लावले आहेत का, याची तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. फलक उपलब्ध नसल्यास तातडीने नवीन फलक तयार करून देण्याच्या सूचना संबंधित आगारांना देण्यात आल्या आहेत. भाडे तपासणी दरम्यान तपासनिसांनीही डिजिटल बोर्ड सुरू असल्याची पडताळणी करावी, असे नमूद करण्यात आले आहे. प्रवाशांना अचूक व वेळेवर माहिती मिळावे यासाठी पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपी) प्रशासनाने बसमधील एलईडी (डिजिटल) मार्गदर्शक फलक नियमित सुरू ठेवण्याचे सक्त आदेश दिले आहेत.



### बसची नोंद ठेवून तपासणी करा

**» खासगी कंत्राटदारांच्या बसमध्येही डिजिटल प्रणाली कार्यान्वित नसल्यास संबंधित ठेकेदारांवर जबाबदारी निश्चित करण्यात येणार आहे. तसेच, सकाळी आठ वाजल्यापासून डेपोमधून सुटणाऱ्या प्रत्येक बसची नोंद ठेवून तपासणी करण्याचे आदेश प्रशासनाने दिले आहेत. डिजिटल फलक बंद राहिल्यास महामंडळाची प्रतिमा मलिन होत असल्याची खंत व्यक्त करत, या प्रकरणात कोणतीही हलगर्जीपणा सहन केला जाणार नसल्याचे पीएमपी प्रशासनाने स्पष्ट केले आहे.**

# नदीसुधार प्रकल्पावर प्रश्नचिन्ह; वाकड-सांगवी टप्प्यावरून नागरिकांचा सवाल

## मध्यवर्ती पुणे वगळून शहराच्या वेशीवर विकासकामे; 44 किमी, 4500 कोटींच्या प्रकल्पाच्या प्राधान्यक्रमावर वाद

**पुणे | प्रतिनिधी**

मुळा-मुठा नदीकाठ सुशोभित करण्यासाठी शहरात नदीसुधार आणि सुशोभीकरणाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविला जात आहे. मात्र, या प्रकल्पाच्या महापालिकेच्या प्राधान्यक्रमावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. संगमवाडी परिसरात कामाची सुरुवात केल्यानंतर आता एकदम शहराच्या दुसऱ्या टोकावरील वाकड ते सांगवी या आठ किलोमीटर नदीकाठाच्या विकासाचा टप्पा हाती घेण्यात आला आहे. मात्र, हा भाग शहराच्या वेशीवर असल्याने मध्यवर्ती पुण्यातील नागरिकांना या प्रकल्पाचा प्रत्यक्ष लाभ कसा मिळणार? तसेच सलगतेने प्रकल्प राबविण्याऐवजी ठिगळे लावल्यासारखा का केला जात आहे? असे सवाल नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत.

महापालिकेतर्फे नदीसुधारच्या दुसऱ्या टप्प्याचे सर्वेक्षण करण्यात आले. यात नदीची व जमिनीची पातळी, झाडांचे सर्वेक्षण आदींचा समावेश होता. महापालिकेला बालेवाडी ते कस्पटे पुलादरम्यानची 720 मीटर लांबीची जागा उपलब्ध झाली. त्यानुसार महापालिकेने तेथे नदीकाठ सुधार प्रकल्पाच्या कामास सुरुवात केली आहे. या पहिल्या टप्प्यातील कामांमध्ये नदीकाठावरील भिंत, भराव, नदीकाठाच्या संरक्षणासाठी दगडी तटबंदी (गॅबियन वॉल), लँडस्केपिंग आदी कामांचा समावेश आहे. उर्वरित कामे पुढील टप्प्यात करण्याचे नियोजन आहे. प्रशासनाच्या मते, शहराचे पर्यावरणीय संतुलन राखत नदी परिसराचा विकास करण्याचा उद्देश आहे. मात्र, शहरातील दाट लोकवस्ती असलेल्या मध्यवर्ती भागात नदीपात्राची अवस्था आजही बिकट आहे. सिंहगड रस्ता परिसर, एकतानगरी तसेच इतर मध्यवर्ती भागांत नदीकाठावर अतिक्रमणे, कचरा आणि सांडपाण्याचे प्रश्न कायम आहेत.

नदीकाठाचा विकास करताना नैसर्गिक प्रवाह, पूररेषा आणि जैवविविधता यांचा सखोल अभ्यास आवश्यक असतो. केवळ काँक्रिटीकरण आणि सजावटीच्या कामांमुळे नदीसुधार झाला, असे मानता येणार नाही. दरम्यान, मध्यवर्ती पुण्यातील नागरिकांनी संतुलित आणि सर्वसमावेशक विकासाची अपेक्षा व्यक्त केली आहे. नदीसुधार प्रकल्पाचा पुढील टप्पा शहराच्या मध्य भागात कधी हाती घेतला जाणार, याबाबत प्रशासनाने स्पष्ट भूमिका जाहीर करावी, अशी मागणी जोर धरत आहे.



### 720 मीटर अंतराचे काम सुरू

» सांगवी पूल ते वाकडदरम्यानच्या मुळा नदीच्या एका काठावरील आठ किलोमीटर कामाची निविदा पिंपरी-चिंचवड महापालिकेने यापूर्वीच काढली आहे. या कामाला सुरुवातही झाली आहे. पुणे महापालिकेने दुसऱ्या काठावरील पीपीपी तत्त्वावरील कामाची 303 कोटी रुपये कामाची निविदा पूर्वीच काढली होती. परंतु, प्रतिसाद न मिळाल्याने फेरनिविदा काढण्यात आली. यात बालेवाडी ते कस्पटे पूल यादरम्यानच्या 720 मीटर अंतराचे काम सुरू करण्यात आले आहे.

### 44 किलोमीटर लांबीचा प्रकल्प

» नदीकाठ सुधार प्रकल्पांतर्गत पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतून वाहणाऱ्या मुळा-मुठा नद्यांच्या दोन्ही काठांचे सुशोभीकरण टप्प्याटप्प्याने सुरू आहे. सुमारे 44 किलोमीटर लांबीचा हा प्रकल्प 11 टप्प्यांत राबविण्यात येत असून, त्यासाठी साडेचार हजार कोटी रुपयांहून अधिक खर्च अपेक्षित आहे. या प्रकल्पातील टप्पा क्रमांक 9, 10 आणि 11 (संगमवाडी ते कल्याणीनगर) यांची कामे यापूर्वीच सुरू केली आहेत. दरम्यान, संगमवाडी ते येरवडा या टप्प्यातील कामेही वेगाने सुरू आहेत.

> पिंपरी परिसरातील टप्प्याचे काम सध्या सुरू आहे. त्यांवेळी दोन्ही भागांच्या कामाच्या निविदा एकाच वेळी काढल्या होत्या. जर एकाच भागाचे काम केले, तर दुसऱ्या भागाला पावसाळ्यात बाधा होऊ शकते. त्यामुळे एकाच वेळी काम करावे, असे त्या वेळी ठरविण्यात आले. येथून पुढे आम्ही प्राधान्यक्रम ठरवला आहे. त्यानुसार कामे केली जाणार आहेत.
>
> - दिनकर गोजारे, प्रकल्प विभागप्रमुख, महापालिका

# हडपसरमध्ये मजुरांच्या वसाहतीत आग; 19 झोपड्या भस्मसात

## अग्निशमन दलाच्या जवानांनी अथक प्रयत्नानंतर आग आटोक्यात आणली. सुदैवाने या घटनेत कोणी जखमी झाले नाही.

**पुणे | प्रतिनिधी**

हडपसर भागातील राममनोहर लोहिया उद्यानाजवळ असलेल्या मजुरांच्या वसाहतीत शनिवारी मध्यरात्री आग लागली. आगीत १९ झोपड्या, तसेच तीन दुचाकी भस्मसात झाल्या. आग लागल्यानंतर मजूर, तसेच कुटुंबीय बाहेर पडल्याने मोठी दुर्घटना टळली. अग्निशमन दलाच्या जवानांनी अथक प्रयत्नानंतर आग आटोक्यात आणली.

पुणे-सोलापूर रस्त्यावर राममनोहर लोहिया उद्याना आहे. उद्यानाच्या मागील बाजूस मजुरांची वसाहत आहे. मध्यरात्री अडीचच्या सुमारास वसाहतीतील एका झोपडीला आग लागली. झोपड्या तात्पुरत्या स्वरुपात बांबू आणि पत्र्याचा वापर करुन बांधण्यात आल्या आहेत. गृहोपयोगी साहित्याने पेट घेतल्यानंतर आग भडकली. आग भडकल्यानंतर शेजारी असलेल्या झोपड्यांनी पेट घेतला. आग लागलात वसाहतीतील मजूर आणि कुटुंबीय बाहेर पडल्याने मोठी दुर्घटना टळली. आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे पाच बंब, टँकर घटनास्थळी दाखल झाले. आग भढकल्याने जवानांनी चहुबाजूंनी पाण्याचा मारा सुरू केला. दोन तासांच्या अथक प्रयत्नानंतर आग आटोक्यात आणण्यात यश आले.

आगीत १९ झोपड्या भस्मसात झाल्या, तसेच तीन दुचाकीही जळल्या. आगीत कपडे, धान्य, तसेच अन्य साहित्य जळाले. मध्यरात्री आग लागल्याने मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता होती. मात्र, प्रसंगावधान राखून मजूर आणि कुटुंबीय बाहेर पडल्याने मोठी दुर्घटना टळली. अग्निशमन अधिकारी प्रमोद सोनवणे, विलास दडस यांच्या मार्गदर्शनाखाली जवानांनी पाण्याचा मारा करुन आग आटोक्यात आणली.




### कुटुंबीयांना अश्रू अनावर

» हडपसरमधील राम मनोहर लोहिता उद्यानाजवळ तात्पुरत्या स्वरुपात झोपड्या उभारण्यात आल्या आहेत. या भागात राहणारे मजूर आणि कुटुंबीयांचे हातावर पोट आहे. आग लागल्यानंतर त्वरीत वसाहतीत सर्वजण बाहेर पडल्याने गंभीर दुर्घटना टळली. आगीत गृहोपयोगी साहित्य जळाल्याने मजुरांच्या कुटुंबीयांना अश्रू अनावर झाले.

### बोपोडीत भंगार मालाच्या दुकानात आग

» बोपोडीतील छाजेड पेट्रोल पंपाजवळ असलेल्या भंगार मालाच्या दुकानाला शनिवारी पहाटे आग लागली. आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी दाखल झाले. जवानांनी पाण्याचा मारा करुन आग आटोक्यात आणली. आगीत कोणी जखमी झाले नाही, अशी माहिती अग्निशमन दलाकडून देण्यात आली. उन्हाळा सुरू झाल्यानंतर आग लागण्याच्या घटना वाढतात. उष्णतेमुळे आग भडकते. शॉर्टसर्किटमुळे आग लागण्याच्या घटना घडतात, अशी माहिती अग्निशमन दलाकडून देण्यात आली.